MHJN080000802024

निशाणी क्र.०८ खालील आदेश
(दिनांक २७/०३/२०२५)

प्रस्तुत अर्ज वादीने न्यायालयीन आयुक्त नेमणुक होणेकरीता केलेला आहे.

२) वादीने असे कथन केले की, मुळ दावा प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण काढणेसाठी व त्याचा ताबा मिळणेसाठी दाखल केले आहे. वादीने अतिक्रमण निश्चीत करण्यासाठी मोजणी होवुन मिळावी याकरीता भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांना विनंती केली. परंतु सदर कार्यालयाने मोजणी न करता न्यायालयात जाण्याचे सांगितले. प्रतिवादींनी वादीच्या शेतजमीनीवर अतिक्रमण केले आहे. करीता भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक व्हावी, अशी विनंती वादीने केली.

३) प्रतिवादी यांना दावा समन्स तामील होवुन देखील त्या न्यायालयासमक्ष हजर झाले नाहीत. सदरचा दावा त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात येत आहे.

४) अभिलेखाचे अवलोकन केले.

५) या आदेशाचे योग्य ते न्यायनिर्णयासाठी मी खालील मुद्दे निर्धारीत करुन त्यावर माझा निष्कर्ष खालील दिलेल्या कारणास्तव नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक वादविषयाबाबत योग्य न्यायदान करण्यासाठी आवश्यकता आहे का ? | होय. |
| २) | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

६) अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना दावा समन्स तामील झालेले असुन त्यांनी प्रकरणात हजर होवुन दावा जमीन मोजणी करण्याच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

७) मा. उच्च न्यायालयाने या पुढील न्यायनिर्णयामध्ये ***Shri Bhupendra s/o Bhagwat Turkar Vs. Shri Homeraj s/o Zituji Meshram reported in 2014(3) All MR 365,*** 'The Hon'ble our High Court held that, *in the cases of boundary dispute and identity of the land, measurement thereof and area of the land is needed to be considered preferably on the basis of authentic evidence and map of the land drawn by competent public official. It is further held that, it is always desirable to get the suit land or field measured by an expert or competent public official to find out the area of the suit land encroached upon more so, when oral evidence can not help the Court*. In view of above ratio, in this case also, there is requirement to get measure the suit land', असे निर्णय आलेले आहे. वरील न्यायनिर्णयाच्या आधारे या प्रकरणामध्ये या मताला आल आहे की, या प्रकरणात हद्दीचा वाद व अतिक्रमणाचा वाद असल्याचे न्यायालयीन आयुक्त नेमल्यावर सदरचे प्रकरणात निर्णय करणे सोयीचे होईल. वादी व प्रतिवादी या दोघांच्या म्हणण्यानुसार व सांगितलेल्या शर्ती व अटीनुसार न्यायालयीन आयुक्त नेमणुक केल्यास कोणाचेही नुकसान होणार नाही.

८) सदर बाब लक्षात घेता, न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती केल्यास निश्चितच दाव्याच्या परिणामकारक निकालासाठी व उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी

मदत होईल. तसेच, सदर न्यायालयीन आयुक्तची मागणी ही पुरावा गोळा करण्यासाठी केलेली दिसुन येत नाही. करीता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. तालुका निरीक्षक भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी, ता. घनसावंगी, जि. जालना यांना सदर प्रकरणात न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.

२. न्यायालयीन आयुक्ताने मौजे घनसावंगी, ता. घनसावंगी, जि. जालना येथील गट क्र.२२८ ची व त्यामधील सह धारक यांच्या जमीनीची तसेच लगतच्या शेतजमीनींची मोजणी करुन भूमापन संहिते अन्वये करावी व मोजणी नकाशा तयार करुन सविस्तर मोजणी अहवाल नकाशासह न्यायालयात दिनांक ०९/०५/२०२५ पावेतो सादर करावा.

३. मोजणीसाठी आवश्यक दस्तऐवज पुर्तता उभयपक्षांनी तात्काळ करावी.

४. न्यायालयीन आयुक्ताचा आवश्यक तो खर्च वादीने सोसावा व तो खर्च भूमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी येथे भरावा.

५. न्यायालयीन आयुक्त नियुक्तीची पत्र देण्यात यावे.

स्वाक्षरीत/-
दिनांक २७/०३/२०२५
(श्रीमती एल. एन. पांचाळ)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
घनसावंगी.